# धोबी जातीबाबत

क्रमांक : जाप्रप / मार्गदर्शन / ९७-९८ / का - २ / ९२१
समाजकल्याण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे - १
दिनांक : ९/६/१९९८

प्रति,
तहसिलदार,
तहसिलदार कार्यालय,
उत्तर सोलापूर

**विषय : जातीचे प्रमाणपत्र पडताळणीबाबत**

संदर्भ : आपले पत्र क्र. जबाबी - २ / कावि / १५ / ९८ दिनांक ५ / ६ / १९९८

उपरोक्त संदर्भांकित पत्रानुसार आपण श्री. सिकंदर आब्बास अली शेख यांना मुस्लीम धोबी या जातीचा दाखला देता येतो किंवा नाही याबबत या कार्यालयाचे मार्गदर्शन मागविले आहे.

शासन समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, निर्णय क्र. सीबीसी - १०९६ / प्र.क्र. ४८ / मावक - ५, दि. ३ जून १९९६ अन्वये जातीचे दाखले देण्याबाबतचे मार्गदर्शन अलाहिदा दिलेलेच आहेत. तसेच शासन समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग निर्णय क्र. सीबीसी - १६८२ / ५८५५३ / (८९२) / का - ५, दिनांक २९ जानेवारी १९८३ अन्वये इतर मागासवर्गीयांच्या यादी संदर्भात कोणतेही धार्मिक बंधन लावण्यात येऊ नये आणि या यादीचा फायदा सर्व धर्मियांना देण्यात यावा असे आदेश दिलेले आहेत, त्यामुळे मुस्लीम धर्मियांना इतर मागासवर्गाचे दाखले देताना खाली दर्शविलेल्या बाबींचा शहानिशा करून दाखले देण्यात यावेत.

१. अर्जदाराच्या शाळा सोडल्याचा दाखला
२. जन्ममरणाचे उतारे
३. लग्नाचे उतारे
४. महसूली पुरावे
५. व्यवसायाचा पुरावा तसेच त्यांचे रोटी बेटी व्यवहार कोठे झाले ते पहावे.
६. समाजाचा दाखला व शालेय गृह चौकशी करावी.

वरील गोष्टींची शहानिशा करून व आपली खात्री झाल्यास संबंधितास जातीचा दाखला द्यावा अशी या कार्यालयाची धारणा आहे.

**उप संचालक (जाप्रप)**
**समाजकल्याण संचालनालय, म. रा. पुणे**
**यांचे करिता**

सोबत : पाने क्र. १ ते २३ जोडली आहेत.